# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ११/०६/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा दांडेकर लेआउट बुटीबोरी येथे दिनांक ०७/०६/२०२२ ते दिनांक ०९/०६/२०२२ चे १८.३० वा. ते १९.०५ वा. सुमारास फिर्यादी नामे– श्याम विठ्ठलराव डंभारे, वय ४७ वर्ष, रा. प्लॉट क्र. ३९ ए दांडेकर लेआउट बुटीबोरी हे चंद्रपुर येथे एमआयडीसी कंपनी मध्ये सन २०१९ पासुन इंजिनियर आहेत. त्यांची पत्नी हि बुटीबोरी येथे तिचे मुलीसह वास्तव्यात राहत असून फिर्यादी हे रूम करून चंद्रपुर येथे राहतात. ते दिनांक ०७/०६/२०२२ रोजी सायंकाळी त्याचे गावी वनी येथे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोडुन कपाटातील नगदी १०,०००/–रू. सोन्या–चांदीचे कि. ५५,०००/–रू. दागिने असा एकुण कि. ६५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार पारधी मो. नं. ७७४१०२२७३१ हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा जिवनविकास उमरेड येथे दिनांक ३०/०५/२२ चे १३/०० वा. दरम्यान फिर्यादी अशोक रामदासजी झाडे, वय ५५ वर्ष, रा. जिवन विकास चौक उमरेड यांचे मोबाईल वर आरोपीने फोन करून लिंक पाठवली. फिर्यादी ने ती लिंक बॅकेतुन आली असल्याचे वाटल्याने फिर्यादीने त्या लिंकवर क्लिक केल्याने फिर्यादीचे बॅक स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा उमरेड येथील खाते मधुन एकुण ३९,५२१/–रू. ची कपात झालेली आहे. आरोपीने फिर्यादीचे खात्यामधुन ऑनलाइन पद्धतीने ३९,५२१/–रू. काढुन घेत फिर्यादीची फसवणुक कलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सह कलम ६६ ड माहीती तंत्रज्ञान अधि २००० अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे मो.नं ९९२३३७४२९० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**